**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार  दिनांक २१ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **तिसऱ्या मुंबईतलं पहिलं शहर म्हणून रायगड-पेण ग्रोथ सेंटरची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दावोस इथं घोषणा**

2. **उघड्या डोळ्यांनी स्वप्न बघून ते पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचं भारतीय जन संचार संस्थानच्या कुलगुरू डॉ. प्रग्या पालीवाल गौड यांचं अमरावतीत विद्यार्थ्यांना आवाहन**

3. **भारत विरुद्ध न्युझीलंड यांच्यातल्या  पाच टी- २० सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज नागपुरात**

4. **थंडीचा जोर ओसरला ; राज्यासह विदर्भात किमान तापमानात वाढ**

**-----------------------------------**

**दावोस**

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मुंबईतील पहिलं शहर म्हणून रायगड पेण ग्रोथ सेंटरची घोषणा केली. नवी मुंबई विमानतळापासून पंधरा ते वीस किलोमीटरवर हे ग्रोथ सेंटर निर्माण करण्यात येणार आहे. गेल्या तीन-चार वर्षांपासून यासाठीच्या परवानग्या मिळवण्याचा प्रयत्न केला जात होता. त्या मिळाल्यानंतर तिसऱ्या मुंबईतल्या पहिल्या शहराची घोषणा करण्यात येत आहे, अनेक गुंतवणूकदारांनी यात गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं

***(होल्ड बाईट मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस -१३ सेकंद)***

स्वित्झर्लंडमध्ये जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने करण्यात येणारा दावोस दौरा हा भारतात आणि पर्यायाने महाराष्ट्रात ज्ञान, तंत्रज्ञान आणि विदेशी गुंतवणूक मिळवण्यासाठीचा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. दावोस दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी अनेक सामंजस्य करार केले. यात युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, युनिव्हर्सिटी ऑफ बर्कले, टेक्निकल युनिव्हर्सिटी

ऑफ म्युनिक, अर्बन फ्युचर्स कलेक्टिव्ह-लंडन, आयसीसीआय-इटली, अँलाँग ट्युनिंग इन्स्टिट्यूट, नॉर्वेजीयन जिओ टेक्निकल इन्स्टिट्यूट, अर्बन प्लॅनिंगमधील सुबाना जुराँग यांच्यासोबतच्या करारांचा समावेश आहे.

-------------------------------------

**अश्विनी वैष्णव**

देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रात भारत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रसार करण्याचा प्रयत्न करत आहे, असं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या 'नो रेफरी' या सत्रात बोलत होते. ग्राफीक प्रोसेसिंग युनिटची उपलब्धता असणं एआयच्या प्रसारासाठी आवश्यक आहे. सार्वजनिक खासगी भागीदारीद्वारे सरकार ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याचं वैष्णव म्हणाले. आतापर्यंत ३८ हजार जीपीयू पॅनलमधे समाविष्ट केल्याचं त्यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव- ३२ सेकंद)***

-------------------------------------

**विजय वडेट्टीवार**

चंद्रपूर महापालिका निवडणुकीनंतर काँग्रेसमध्ये निर्माण झालेला वाद लवकरच मिटेल आणि महापालिकेत काँग्रेसचाच महापौर बसेल, असा विश्वास काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केला. पक्षात खासदार-आमदार मालक नसून कार्यकर्तांच पक्षाचा आत्मा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. नागपुरात होणाऱ्या बैठकीत नगरसेवकांची मतं घेऊन महापौर आणि गटनेत्याचा निर्णय घ्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. ओबीसी आरक्षणात कपात झाल्यास त्याला भाजप जबाबदार असेल, अशी टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

-------------------------------------

**नक्षलवादी आत्मसमर्पण**

छत्तीसगडच्या गरियाबंद जिल्हयात नऊ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं. यातल्या एका महिलेनं जिल्हयातल्या इतर नक्षलवाद्यांना शरण येण्याचं आवाहन केलं आहे. जिल्हयाचे पोलीस अधीक्षक वेदव्रत सिरमौर यांनीही या परिसरातल्या नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचं आवाहन केलं आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हा आणि सरकारच्या पुनर्वसन धोरणाचा लाभ उठवा, असं ते म्हणाले. छत्तीसगढमध्ये गेल्या दोन वर्षांत दोन हजारहून अधिक नक्षलवाद्यांनी शस्त्रं खाली ठेवून मुख्य प्रवाहात सामील व्हायचा निर्णय घेतला आहे.

------------------------------------

**प्यारे खान**

राज्यात अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे. प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आता ही समिती जिल्हाधिकाऱ्यांऐवजी निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहणार आहे. या समितीत लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला आहे. "ही समिती अल्पसंख्याकांच्या हक्कांची संरक्षक आणि त्यांच्या प्रगतीची मार्गदर्शक ठरेल" असं प्रतिपादन राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी केलं आहे.

------------------------------------

**कुलगुरू डॉ. प्रग्या पालीवाल गौड**

प्रत्येकाच्या आयुष्यात महाविद्यालयीन जीवन हे एकदाच मिळते. या महाविद्यालयीन जीवनात शिकलेली प्रत्येक गोष्ट आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आपल्या सोबत राहते त्यामुळे खूप स्वप्न बघा, उघड्या डोळ्यांनी स्वप्न बघा आणि ते पूर्ण करण्याची जबाबदारी स्वीकारून उज्वल भविष्यासाठी वाटचाल करा, असे प्रतिपादन भारतीय जन संचार संस्थानच्या कुलगुरू डॉ. प्रग्या पालीवाल गौड यांनी केलं. डॉ. प्रग्या पालीवाल गौड यांनी आज अमरावती कॅम्पसला भेट दिली. यावेळी आयोजित विद्यार्थी संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. त्यांनतर त्यांनी बडनेरा येथे सुरु असलेल्या कॅम्पस बांधकामाचं अवलोकन करून झालेल्या कार्याचा आढावा घेतला. जनसंवाद व पत्रकारितेचे शिक्षण घेत असताना या क्षेत्रात होणारे बदल आत्मसात करणे आवश्यक आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया क्षेत्रात खूप उपयुक्त ठरत आहे, ते आपण शिकाल पाहिजे असं त्यांनी विद्यार्थ्यांना आवर्जून सांगितलं

------------------------------------

**मधाचे गाव**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'मधाचे गाव' योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यातील आमझरी इथल्या स्थानिक आदिवासी महिलांना सातेरी मधमाशा पालनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. साधनसंपत्ती आणि मुबलक फुलोरा असलेल्या या भागात मधमाशा संवर्धनातून निसर्गाचे रक्षण करणे, मध आणि त्यापासून तयार होणाऱ्या उत्पादनांची विक्री व्यवस्था करणे आणि मधुपर्यटनाच्या माध्यमातून गावाला स्वयंपूर्ण बनविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यात पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या 10 गावांमध्ये आमझरीचा

समावेश असून, सध्या जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली येथे विविध उपक्रम राबविले जात आहेत.

-----------------------------------

**जन्मठेपेची शिक्षा**

आकोल्यातील बहुचर्चित हुंडीवाले हत्याकांड प्रकरणी जिल्हा न्यायालयाने दहा आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून पुराव्याअभावी पाच आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. ६ मे २०१९ रोजी धर्मदाय आयुक्त कार्यालयात शिक्षण संस्थेच्या वादातून समाजसेवक किसनराव हुंडीवाले यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात विशेष सरकारी वकील ॲड. उज्ज्वल निकम यांनी सरकारची बाजू प्रभावीपणे मांडली.

-----------------------------------

**टी ट्वेंटी**

भारत विरुद्ध न्युझीलंड यांच्यातली पाच टी ट्वेंटी सामन्यांची मालिका आजपासून सुरु होत आहे. या मालिकेतला पहिला सामना आज संध्याकाळी सात वाजता नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर होणार आहे. एकदिवसीय मालिकेतील, पराभवानंतर कर्णधार, सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली, टीम इंडिया टी-२० मालिकेत, पुनरागमन करण्याच्या तयारीत आहे. टी-२० विश्वचषक-२०२६ पूर्वीची ही, दोन्ही संघांसाठी महत्त्वाची कसोटी मानली जात आहे.भारतीय संघात संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा सलामीला उतरण्याची शक्यता असून, गोलंदाजीत जसप्रीत बुमराह आणि अर्शदीप सिंग यांच्याकडे लक्ष असेल. जामठा येथील खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना अनुकूल मानली जाते. भारत-न्यूझीलंड यांच्यात, इथं होणारा हा पहिला, द्विपक्षीय टी-२० सामना ठरणार आहे. या सामन्यासाठी हजारो प्रेक्षक जामठा परिसरात दाखल झाले आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, प्रेक्षकांनी जास्तीत जास्त, मेट्रोचा वापर करावा असं आवाहन, डी.सी.पी. मतानी यांनी केलं आहे. मेट्रो स्टेशनपासून स्टेडियमपर्यंत, फीडर बसची मोफत सुविधा, उपलब्ध करून देण्यात आली आहे.

-----------------------------------

**हवामान**

राज्यासह विदर्भात देखील थंडीचा जोर कमी झाला असून आज गोंदिया इथं 13 पूर्णांक 5 इतक्या सर्वात कमी किमान तापमानाची नोंद करण्यात आली. नागपुरात 13 पूर्णांक 7 अंश सेलसियस, गडचिरोली १४ पूर्णांक ४, वर्धा इथं १४ पूर्णांक ५, तर अमरावती इथं १५ पूर्णांक ३ अंश सेल्सिअस इतक्या किमान तपमानाची नोंद झाली. बुलढाणा आणि अकोला इथं १६ अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान राहील.

दरम्यान अमरावती इथं 33 अंश सेलसियस इतक्या कमाल तापमानाची नोंद झाली आहे.

-------------------------------------